# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ३०९ - २३** **दिनांक : - १२/०९/२०२३**

## ब्राउन शुगर या अंमली पदार्थासह दोन आरोपींना अटक
## नालासोपारा पोलीस ठाणेची कामगिरी.

नालासोपारा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रामध्ये दिनांक ०८/०९/२०२३ रोजी १७.०० वा. च्या सुमारास डांगेवाडी, नालासोपारा पश्चिम येथे दोन इसम हे ब्राउन शुगर या अंमली पदार्थाची विक्री करत असल्याची खात्रीशीर बातमी नालासोपारा पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे सहाय्यक पोलीस निरीखक पंडीत मस्के यांना मिळाल्याने सदर बातमीच्या आधारे मिळालेल्या बातमीचा आशय वरीष्ठांना कळवुन त्यांनी दिलेल्या आदेशान्वये लागलीच सदर ठिकाणी सापळा रचुन दोन आरोपींना शिताफीने पकडले. त्यांना त्यांची नावे विचारली असून त्यांनी त्यांचे नावे १) ईशारुल इंसान शेख, वय २८ रा. नालासोपारा (प),ता-वसई, जि-पालघर.२) राणा टुकू शेख, वय ३० वर्षे, रा. नालासोपारा (पूर्व), ता-वसई, जि-पालघर असे सांगितले. दोन्ही संशयीतांची झडती घेतली असता त्यांचे कब्जामध्ये एकुण ५७,७००/- रुपये किंमतीचा ५.७७० ग्रॅम वजनाचा ब्राउन शुगर नावाचा अंमली पदार्थ व विक्रीतील रोख रक्कम ४,२००/- मिळुन आली. सदरचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन्ही आरोपीविरुध्द नालासोपारा पोलीस ठाणेस गु.र.क्र. ४२९/२०२३ गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापार परिणाम करणारे पदार्थ अधिनियम कलम ८(क), २१(ब) अन्वये दिनांक ०८/०९/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री अख्तर शेख हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०३, राजेंद्र मोकाशी, सहा. पो.आयुक्त नालासोपारा, यांचे मार्गदर्शनाखाली श्री विजयसिंह बागल, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, सचिन कोतमिरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), स.पो.नि. पंडीत मस्के, पो.हवा. किशोर धनु, हिरालाल निकुंभ, प्रशांत साळुंके, पो.ना. अमोल तटकरे, पो. अं. राजेश नाटुलकर, कल्याण बाचकर, प्रेम घोडेराव, यांनी केलेली आहे.

------------ooooooo----------------